# प्रकरण दुसरे

## अध्ययनाची रूपरेषा

# प्रकरण दुसरे

## अभ्ययनाची रूपरेषा

### २:१ अभ्ययनाचे महत्त्व -

भारतीय अर्थव्यवस्था कृषि प्रधान आहे. तथापि व्यवसायांतर्गत पिकांचा आकृतीबंध आणि पिकांचा फेरपालट याविषयावर सुक्ष्मलक्षी अभ्ययनास अत्यंतिक महत्त्व लाभते. शासकीय स्तरावर प्रामुख्याने पिकांच्या आकृती-बंधाबाबत सांख्यकीय माहिती गोळा केली जाते, प्रसिध्द केली जाते. पण पिकांच्या फेरपालटाबाबत सांख्यकिय माहितीची अनुपलब्दता आढळते. अलीकडच्या कालावधीत राष्ट्रीय स्तरावरील नियोजनामध्ये हरितक्रांतीसारखा यशस्वी कार्यक्रम राबविला जात आहे. परिणामी कृषि उद्योगक्षेत्रात परिवर्तन घडून येत आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी तालुक्यातील १९७१-७२ ते १९८५-८६ या कालावधीतील पिकांचा आकृतीबंध, पिकांचा फेरपालट याविषयीचे सखोल अभ्ययन करण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थात पिक पध्दतीत पिकाचा फेरपालट यांच्या परिवर्तनाच्या दिशेने एकूण प्राप्ती व एकूण खर्च यामध्ये बदल होतो. म्हणून एकूण प्राप्ती व एकूण खर्च याचा तुलनात्मक आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. संशोधनाचा हा पैलू नियोजनाची भावी दिशा ठरविण्याच्या दृष्टीने खचितपणे उपयुक्त ठरेल.

### २:२ अभ्ययनाची उद्दिष्टये -

१. व्यापक अर्थाने ग्रामीण विकासातील कृषि बदलाचे अभ्ययन करणे.
२. कृषि व्यवसायांतर्गत जमीन वापराच्या बदलाचे अभ्ययन करणे.
३. कृषि व्यवसायांतर्गत पिकाच्या आकृतीबंधाचे/पिक पध्दतीच्या बदलाचे अभ्ययन करणे.

४. कृषि व्यवसायांतर्गत पिकाच्या फेरपालटीचे सखोल अध्ययन करणे.

५. ग्रामीण स्तरावरील एकूण प्राप्ती व एकूण खर्चातील बदलाचे अध्ययन करणे.

## २:३ संशोधन पध्दती - रूपरेषा -

### १) खेडयांची निवड -


१९७१-७२ ते १९८५-८६ या १५ वर्षाच्या कालावधीतील राधानगरी तालुक्यातील १९८१ च्या कोल्हापूर जिल्हा जनगणनेनुसार एकूण खेडयांपैकी (११३) स्थूलपणे यादृच्छिक पध्दतीने १० टक्के खेडयांची नमुना करता निवड केली. म्हणजेच एकूण १२ खेड्यांची निवड करण्यात आली. सदर खेडी निवडताना खेड्याची लोकसंख्या, खेडयातील एकूण भूधारण क्षेत्र, जमीनीची प्रतवारी, नदीचे सानिध्य इ. निकष आधारभूत मानले.

तक्ता क्र. २:१ नमुना खेडी निवड (१९८१ च्या जनगणनेप्रमाणे)

| अ.नं. | गावाचे नाव | लोकसंख्या | एकूण जमीन | एकूण जलसिंचीत जमीन |
|---|---|---|---|---|
| १. | तुरंबे | २८४३ | २१७२.५ | २७० |
| २. | कासारवाडा | १०४२ | ८६५ | १७.५ |
| ३. | आकनूर | २०३२ | ९७५ | ७७.५ |
| ४. | ठिपकुर्ली | ३६४३ | २३८७.५ | ६० |
| ५. | शिरगाव | २८८५ | २३७५ | १२.५ |
| ६. | फेजिवडे | ३८९७ | १०७९३ | ५२.५ |
| ७. | शेळेवाडी | १०२३ | ३३२.५ | १२.५ |
| ८. | दुर्गमानवाड | १०१३ | १७६० | २२.५ |
| ९. | कोते | १३५० | २६९५ | २० |
| १०. | आवळी बु.। | २४६९ | १३८५ | २१२.५ |
| ११. | तळाशी | १६६६ | २७६० | २२.५ |
| १२. | तारळे क. | ३२१६ | १५१२.५ | ५५७.५ |

संदर्भ - कोल्हापूर जिल्हा जनगणना १९८१.

# राधानगरी तालुक्यातील नमुना निवड खेडी



२) उत्तरदात्याची निवड -

स्थूलपणे ४० ते ५० वर्ष वयोगटातील उत्तरदात्या शेतक-याची, हेतूपुरस्सर निवड करण्यात आली. प्रत्येक नमुना निवड खेड्यातील ६ शेतक-याची नमुना वजा निवड केली. यापैकी तीन शेतकरी बागायत गटातील व तीन शेतकरी जिरायत गटातील तसेच बागायत आणि जिरायत गटातील प्रत्येक तीन शेतक-यांची पुढील प्रमाणे निवड केली. २.५ एकरपेक्षा कमी भूधारणा क्षेत्र असणारी एक शेतकरी, २.५ ते ५ एकर भूधारण क्षेत्र असणारा शेतकरी एक, आणि ५ एकरापेक्षा जास्त भूधारणा क्षेत्र असणारा एक शेतकरी या संबंधी पुढील तक्ता मार्गदर्शक ठरतो.

तक्ता क्र.२:२ - उत्तरदात्यांची निवड

| अ.नं. | गावाचे नाव | बागायत | | | जिरायत | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २.५ एकर पेक्षा कमी | २.५ ते ५ एकर | ५ एकरा पेक्षा जास्त | २.५ एकरा पेक्षा कमी | २.५ ते ५ एकर | ५ एकरा पेक्षा जास्त | |
| १. | तुरंबे | १ | १ | - | - | - | ४ | ६ |
| २. | कासारवाडा | - | १ | २ | - | १ | २ | ६ |
| ३. | आकनूर | - | २ | १ | १ | १ | १ | ६ |
| ४. | ठिपकुर्ली | - | - | १ | - | १ | ३ | ६ |
| ५. | शिरगाव | - | - | २ | - | - | ४ | ६ |
| ६. | फेजिवडे | - | - | १ | - | ३ | २ | ६ |
| ७. | शेळेवाडी | - | २ | - | २ | २ | - | ६ |
| ८. | दुर्गामानवाड | १ | - | - | - | १ | ४ | ६ |
| ९. | कोते | - | - | - | १ | ४ | १ | ६ |
| १०. | आकळी बु. | - | १ | ३ | - | २ | १ | ७ |
| ११. | ठाशी | १ | २ | - | १ | १ | १ | ६ |
| १२. | तारळे क. | १ | ३ | १ | - | - | १ | ६ |
| | एकूण .. | ४ | १२ | ११ | ५ | १६ | २४ | ७२ |
| | टक्केवारी .. | ५.५ | १६.६ | १५.२ | ६.९ | २२.२ | ३३.३ | १००.०० |

निवडलेल्या एकूण उत्तरदात्यांची संख्या ७२ इतकी आहे. त्यापैकी २७ उत्तरदाते बागायत गटातील आणि ४५ उत्तरदाते जिरायत गटातील आहेत. त्यांची एकूण उत्तरदात्याशी असणारी टक्केवारी अनुक्रमे ३७.५ व ६२.५ आहे. अभ्यासक्षेत्रातील एकूण उत्तरदात्यापैकी जिरायत गटातील उत्तरदात्याची संख्या जास्त असण्याचे प्रमुख कारण म्हणजे या क्षेत्रातील बहुसंख्य उत्तरदात्याकडे एकूण धारणक्षेत्रापैकी तुलनात्मक दृष्टया जिरायत धारणक्षेत्र जादा आहे. तसेच त्यांच्याकडे त्यांच्या मालकीची बागायत धारणक्षेत्र अत्यल्प आहे. मात्र बागायत उत्तरदात्यांच्या बाबतीत त्याचे धारणक्षेत्र पूर्णत: ओलीताखाली आहे. तसेच बागायत भूधारण क्षेत्रातील उत्तरदात्यांच्या बाबतीत २.५ एकरापेक्षा कमी भूधारण असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ४ इतकी आहे आणि याच गटातील जिरायत भूधारण क्षेत्रातील उत्तरदात्यांची संख्या ५ आहे. तर बागायत भूधारण क्षेत्रामध्ये २.५ एकर ते ५ एकर गटातील उत्तरदात्यांची संख्या१२ आहे. आणि याच गटातील जिरायत भूधारण क्षेत्रातील उत्तरदात्यांची संख्या १६ आहे. तसेच ५ एकरापेक्षा जास्त बागायत भूधारणक्षेत्र असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ११ तर जिरायतमध्ये ती २४ इतकी आहे. एकंदरीत नमुना निवडीमध्ये प्रतिनिधीकता टिकवण्याचा प्रयत्न केलेला आहे.

३) सामग्री संकलन -

अ) दुय्यम सामग्री : अ) तहसीलदार ऑफीस फॉर्म नं. २०

ब) गट विकास अधिकारी

क) ग्रामसेवक

ड) अनुभवी शेतकरी

ब) प्राथमिक सामग्री : मुद्रीत प्रश्नावलीच्या सहाय्याने नमुनावजा निवडलेल्या उत्तरदात्यांशी संपर्क साधला, संशोधनाशी निगडीत तथ्ये संकलीत केली.

४) मर्यादा -

१. संकलीत तथ्यातर्गत उणिवा निर्माण होण्याची शक्यता आढळते. अर्थात त्याचे प्रमुख कारण म्हणजे शेतकरी उत्तरदात्यांचा अडाणीपणा व अज्ञानीपणा होय.

२. मुद्रीत प्रश्नावलीतील उत्तरांची पसंतश्रेणी स्पष्ट करताना मर्यादा पडल्या.

३. एकूण प्राप्ती व एकूण खर्चाची आकडेवारी संकलीत केली. तथापि ही आकडेवारी पूर्णतया बरोबर असेलच असे नाही. त्याचे प्रमुख कारण म्हणजे ही आकडेवारी उत्तरदात्याच्या स्मृतीच्या आधारे गोळा केली आहे.

४. एकूण प्राप्ती व एकूण खर्चाची आकडेवारी चालू किंमतीच्या आधारे गोळा केली आहे.

संशोधन पध्दतीच्या रुपरेषेनुसार, राधानगरी तालुक्यातील उत्तरदात्यांची निवड करून नमुना सर्वेक्षण हाती घेतले. त्या अनुषंगाने संशोधनाशी निगडित असणाऱ्या पुढील मूलभूत पैलूचा आढावा घेतला आहे.

तक्ता क्र. २:३

धर्मपरत्वे उत्तरदात्याचे वर्गीकरण

| अ.नं. | धर्म | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | हिंदू | ६३ | ८७.५ |
| २. | मुसलमान | ७ | ९.७ |
| ३. | जैन | २ | २.७ |
| | एकूण .. | ७२ | १००.०० |

वरील आकडेवारीवरून आपणास असे दिसून येते की, हिंदु उत्तरदात्यांचे प्रमाण ८७.५ टक्के आहे. तर मुसलमान व जैन उत्तरदात्यांचे प्रमाण अनुक्रमे ९.७ टक्के व २.७ टक्के इतके आहे. यावरून आपणास असे म्हणता येईल की राधानगरी तालुक्यात हिंदू धर्माचे लोक अधिक राहतात. आणि मुसलमान व जैन धर्माचे लोक कमी प्रमाणात आढळतात.

तक्ता क्र. २:४

कुटुंबाच्या आकारानुसार उत्तरदात्याचे वर्गीकरण

| अ.नं. | कुटुंबाचा आकार | कुटुंबातील व्यक्तीची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | ३ पेक्षा कमी व्यक्ती | ३ | ४.१ |
| २. | ४ ते ६ व्यक्ती | ३८ | ५२.७ |
| ३. | ७ ते ९ व्यक्ती | १८ | २५.० |
| ४. | १० ते १२ व्यक्ती | १० | १३.८ |
| ५. | १३ पेक्षा जास्त व्यक्ती | ३ | ४.१ |
| | एकूण .. | ७२ | १००.०० |

वरील तक्त्यावरून आपणास असे दिसून येते की, ४ ते ६ व्यक्ती असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण अधिक म्हणजे ५२.७ टक्के इतके आहे. त्यानंतर ७ ते ९ व्यक्ती असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण २५.० टक्के आहे. १३ पेक्षा जास्त व्यक्ती असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण ४.१ टक्के इतके आहे. यावरून आपणास असे दिसून येते की, राधानगरी तालुक्यात विभक्त कुटुंबाचे प्रमाण जास्त आहे. तथापि एकत्र कुटुंब पध्दती सुध्दा येथे आढळून येते.

तक्ता क्र.२:५

लिंगपरत्वे वर्गीकरण

| अ.नं. | लिंग | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | पुरुष | २६८ | ५५.४ |
| २. | स्त्रिया | २१५ | ४४.५ |
| | एकूण स्त्री-पुरुष | ४८३ | १००.०० |

वरील तक्त्यावरून आपणास असे आढळते की, एकूण ७२ कुटुंबातील सर्व स्त्री-पुरुषांची संख्या ४८३ इतकी असून त्यापैकी ५५.४ टक्के पुरुष आहेत. तर ४४.५ टक्के स्त्रिया आहेत. म्हणजेच स्त्रीयांच्या मानाने पुरुषांचे प्रमाण अधिक आहे.

तक्ता क्र.२:६

वयपरत्वे उत्तरदात्याचे वर्गीकरण

| अ.नं. | वय गट | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | ० ते २५ वर्षे | ३ | ४:१ |
| २. | २६ ते ३५ वर्षे | १५ | २०.८ |
| ३. | ३६ ते ४५ वर्षे | २३ | ३१.९ |
| ४. | ४६ ते ५५ वर्षे | १५ | २०.८ |
| ५. | ५५ पेक्षा जास्त | १६ | २२.२ |
| | एकूण .. | ७२ | १००.०० |

वरील तक्त्यामध्ये वयपरत्वे उत्तरदात्याचे वर्गीकरण दर्शविले आहे. यामध्ये ३१.९ टक्के उत्तरदात्ये हे ३६ ते ४५ वयोगटातील आहेत तर, २०.८ % उत्तरदात्ये प्रत्येकी २६ ते ३५ वर्षे व ४६ ते ५५ वर्षे वयोगटातील आहेत. ०.२५ वर्षे

वयोगटातील उत्तरदात्यांचे प्रमाण सर्वात कमी म्हणजे ४.१ टक्के इतके आहे. तर ५५ पेक्षा जास्त वय असणाऱ्या उत्तरदात्याचे प्रमाण २२.२ टक्के आहे.

तक्ता क्र. २:७

शिक्षणपरत्वे उत्तरदात्याचे वर्गीकरण

| अ.नं. | शिक्षण गट | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | अशिक्षित | ११ | १५.२७ |
| २. | पहिली ते ७ वी | २७ | ३७.५ |
| ३. | ८वी ते १०वी | २५ | ३४.७२ |
| ४. | ११ ते १२वी | ४ | ५.५५ |
| ५. | एफ्.वाय. ते टी.वाय. | ३ | ४.१६ |
| ६. | टी.वाय्.पेक्षा अधिक | २ | २.७७ |
| | एकूण .. | ७२ | १००.०० |

वरील तक्त्यामध्ये शिक्षणपरत्वे उत्तरदात्याचे वर्गीकरण दाखविले आहे. त्यामध्ये ७वी पर्यंत शिक्षण घेतलेल्या उत्तरदात्याचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे ३७.५ टक्के इतके आहे. त्या खालोखाल ८वी ते १०वी पर्यंत शिक्षण घेतलेल्या उत्तरदात्याचे प्रमाण ३४.७२ टक्के इतके आढळते. तर अशिक्षित लोकांचे प्रमाण १५.२७ टक्के इतके आढळते. तर पदवीपेक्षा अधिक शिक्षण घेतलेल्या लोकांचे प्रमाण फक्त २.७७ टक्के इतकेच आढळते.

तक्ता क्र.२:८

नमुना लोकसंख्येची वयपरत्त्वे रचना

| अ.नं. | वयगट | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | १८ वर्षाखालील | १६० | ३३.१२ |
| २. | १९ ते ६० वय वर्ष | २९५ | ६१.०७ |
| ३. | ६१ पेक्षा जास्त वय | २८ | ५.७९ |
| | एकूण .. | ४८३ | १००.०० |

वरील तक्त्यामध्ये नमुना लोकसंख्येची वयपरत्त्वे रचना दाखविली आहे. त्यामध्ये ६१.०७ टक्के व्यक्ती या १९ ते ६० वयोगटातील आहेत. तर १८ पेक्षा कमी वय असणाऱ्या व्यक्तीचे प्रमाण ३३.१२ टक्के आहे. आणि ६१ पेक्षा जास्त वय असणाऱ्या व्यक्तींचे प्रमाण फक्त ५.७९ टक्के आहे. यावरुन आपणास असे दिसून येते की, राधानगरी तालुक्यात कर्त्या लोकसंख्येचे प्रमाण अधिक आढळते.

......